विना सहकार नही उध्दार !

# अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

३९/२/२, एरंडवणा, पुणे-४११०३८.

नोंदणी क्र. पी.एन.ए./एच.एस.जी/(टी.सी.)/१७०७/१९८९-९० दि.२७/१०/१९८९

Email: archananagar.chs@gmail.com

2023-24/25C 25.9.23

**अर्चनानगर सहकारी गृहरचना मर्यादित संस्थेच्या विचाराधीन पुनर्विकासाचे अनुषंगाने प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार / आर्किटेक्ट नियुक्तीबाबत दि. ३ सप्टेंबर २०२३ राजी आयोजित सर्वसाधारण बैठकीचे इतिवृत**

दिनांक ३ सप्टेंबर २०२३ रोजी अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्थेच्या विचाराधीन पुनर्विकासाच्या प्राथमिक चर्चेच्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट), वास्तूविशारद (आर्किटेक्ट) यांचे नियुक्तीबाबत समितीने केलेले प्रयत्न, त्यास मिळालेला प्रतिसाद व प्राप्त सर्व प्रस्तावांबाबत वस्तुस्थिती यापूर्वी सर्व सभासदांना कळविली असून त्याबाबत मा. अध्यक्षांनी सर्व सभागृहास पुन्हा सविस्तर विषद केले.

प्राप्त एकूण ९ प्रस्तावांपैकी प्रीबीड सभेनंतर प्राप्त ५ प्रस्ताव व त्यांचे तांत्रिक बीडच्या छाननीनंतर शॉर्टलिस्ट केलेल्या तीन निविदा याबाबत सर्व सभागृहास सविस्तर तपशिलासह सुस्पष्ट कल्पना देण्यात आली. प्रिबीड सभेत ठरल्यानुसार कामाच्या अपेक्षित चार फेज नुसार फेज निहाय निविदा सादर करण्याचे सुचविले होते हे स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर सभागृहाच्या मान्यतेने तीनही निविदा धारकांनी त्यांच्या संस्थेच्या पार्श्वभूमीबाबत संक्षिप्त सादरीकरण केले व सदस्यांनी विचारलेल्या शंकांचे त्यांच्यावतीने स्पष्टीकरण दिले.

त्यानंतर शॉर्टलिस्ट केलेल्या ३ निविदा धारकांच्या आर्थिक निविदा सर्वांसमक्ष उघडण्याचा निर्णय सभेत बहुमताने घेण्यात आला. त्याचा संकलित तपशील स्क्रीनवर सर्वांना सादर करण्यात आला. यानंतर निवड प्रक्रिया बहुमताने पूर्ण होऊ न शकल्यास मतदानाने निर्णय घेतला जाईल, असे अध्यक्षांनी स्पष्ट केले.

याबाबत सभेतील चर्चेत सदस्यांनी उत्फुर्त सहभाग घेतला व सर्वांगीण चर्चा होऊन व्यापक चर्चेअंती श्री. विलास खिंवसरा यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार शॉर्टलिस्ट केलेल्या तिन्ही संस्थांकडून सद्यस्थितीत केवळ पहिल्या फेजचे फिजिबिलिटी रिपोर्ट तयार करून घ्यावेत, असे सभासदांनी हात उंचावून बहुमताने ठरले. त्यामुळे मतदानाची आवश्यकता राहिली नाही.

तीनही निविदा धारकांनी फिजिबिलिटी कामासाठी त्यांचे निविदेत नमूद केलेल्या दरांचा एकत्रित विचार करता या कामासाठी येणारा एकूण खर्च सर्व सभासदांकडून सारख्या प्रमाणात वर्गणी स्वरूपात घेण्यात यावा, असे बहुमताने ठरले. कामास गती देण्याचे दृष्टीने दिनांक २० सप्टेंबर २०२३ पर्यंत सभासदांनी वर्गणी जमा करावी, त्यानंतर विलंबाने वर्गणी जमा केल्यास विलंब शुल्क आकारावे, असे ठरले. सदर वर्गणी जमा करणे ही प्रत्येक सभासदांची जबाबदारी असून वर्गणी जमा न केल्यास नाईलाजाने थकबाकी समजून वसुलीची कार्यवाही करावी, असे बहुमताने ठरले.

समितीला सर्व संभासदांकडून आत्तापर्यंत मिळालेल्या सक्रिय सकारात्मक प्रतिसादाबद्दल कार्यकारी समितीने आभार मानले व सभा संपल्याचे अध्यक्षांनी घोषित केले.

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
अध्यक्ष

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
सचिव